आकाशवाणी मुंबई

प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता

२८ मार्च २०२६ - शनिवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांच्या हस्ते नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन

- ईगव्हर्नन्स कार्यक्रमाअंतर्गत जिल्हाप्रशासनात उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या अधिकाऱ्यांना मुख्यमंत्र्यांच्या हस्ते प्रशस्तीपत्रं प्रदान

- भोंदू बाबा अशोक खरात विरुद्ध आणखी दोन गुन्हे दाखल

- यंदाच्या आयपीएल क्रिकेट स्पर्धेला आजपासून प्रारंभ/ पहिला सामना बंगळुरूमधे 'सनरायझर्स हैदराबाद' आणि 'रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू' यांच्यात रंगणार

**आणि**

- राज्यात अनेक ठिकाणी  वादळी पाऊस तसंच गारपिटीचा इशारा

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी आज उत्तर प्रदेशातल्या गौतम बुद्ध नगर जिल्ह्यातल्या जेवर इथं नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळाच्या पहिल्या टप्प्याचं उद्घाटन केलं.  हा विमानतळ उत्तर प्रदेशचे शेतकरी, लघु आणि मध्यम उद्योजक तसंच युवकांसाठी नव्या संधी घेऊन येणार आहे. प्रधानमंत्री म्हणाले. पश्चिम आशियातील युद्ध स्थितीविषयी ते म्हणाले,

**(होल्ड बाईट प्रधानमंत्री)**

नोएडा आंतरराष्ट्रीय विमानतळ सुमारे ११ हजार २०० कोटी रुपये खर्चून बांधण्यात येणार असून हा देशातल्या सर्वात मोठ्या ग्रीनफील्ड

विमानतळ प्रकल्पांपैकी एक आहे. पहिल्या टप्प्यात विमानतळाची दरवर्षी सुमारे १ कोटी २० लाख प्रवाशांची क्षमता असेल. ती भविष्यात सुमारे ७ कोटी वार्षिक प्रवाशांपर्यंत वाढू शकेल.

**<><><><><>**

मदत सुलभतेने आणि वेगाने पोहोचवण्यासाठी इराणने सहमती दर्शवली आहे. जागतिक पुरवठा साखळीत ही सामुद्रधुनी महत्त्वाचा मार्ग असून तिथं मानवतावादी मदत आणि कृषी मालाची वाहतूक करू देण्याची संयुक्त राष्ट्रांची विनंती तेहरानने स्वीकारली आहे. संयुक्त राष्ट्रांमधे इराणचे राजदूत अली बहरेनी यांनी ही माहिती दिली. इराणच्या अणुउर्जा प्रकल्पांवर हल्ले होत असतानाही ही विनंती मान्य केल्याचं त्यांनी सांगितलं.

दरम्यान भारताची दोन तेलवाहू जहाजं आज होर्मुझची सामुद्रधुनी पार करणार आहेत. भारतीय नौदलाच्या युद्धनौका त्यांच्या रक्षणासाठी तैनात करण्यात आल्या आहेत.

**<><><><><>**

एकीकडे जग तिसऱ्या महायुद्धाच्या उंबरठ्यावर उभे असताना, इराण, इस्त्रायल आणि अमेरिकेतील तणावाने जग ग्रासलेलं असताना जागतिक शांतीसाठी चंद्रपुरातल्या विद्यार्थ्यांनी विश्वविक्रमी उपक्रम केला. चंद्रपूरच्या सोमय्या ग्रुप ऑफ इन्स्टिट्युशनने आज शांतीचे प्रतीक असलेले चिन्ह विद्यार्थ्यांच्या माध्यमातून साकारत गिनिज बुकात नाव नोंदवले. यापूर्वी हा विक्रम एक हजार ७०मुलांचा होता. तो मोडून आज एक हजार तीनशे विद्यार्थ्यांनी हा विश्वविक्रम केला.

**<><><><><>**

विजेवर चालणाऱ्या वाहनांना प्रोत्साहन देण्याच्या हेतूनं आणलेल्या पी एम ई ड्राईव्ह योजनेच्या निकषांमधे केंद्रसरकारने बदल केला आहे. आता ३१ जुलै २०२६ पर्यंत नोंदणी झालेल्या दुचाकी आणि ३१ मार्च पर्यंत नोंदणी झालेल्या इलेक्ट्रिक रिक्षा आणि ढकलगाड्यांना ‘ही’ प्रोत्साहनपर सूट मिळेल. प्रोत्साहन मिळण्यासाठी दुचाकींची कमाल किंमत मर्यादा दीड लाख रुपये तर रिक्षांची कमाल किंमत मर्यादा अडीच लाख इतकी ठेवण्यात आली आहे.

**<><><><><>**

युजीसी अर्थात विद्यापीठ अनुदान आयोगाची २०२६ची जातविषयक समानता नियमावली तसंच एनसीईआरटी अर्थात राष्ट्रीय शैक्षणिक संशोधन आणि प्रशिक्षण परिषदेच्या पाठ्यपुस्तकातल्या एका प्रकरणावरून झालेले वाद टाळण्याजोगे होते, असं केंद्रीय शिक्षणमंत्री धर्मेंद्र प्रधान यांनी म्हटलं आहे. वाद मांडण्याच्या पद्धतींवरही त्यांनी खेद व्यक्त केला. नियमावलीत कोणावरही भेदभाव किंवा अन्याय होणार नाही याची काळजी सरकार नक्कीच घेईल, असं त्यांनी सांगितलं. एनसीईआरटीच्या इयत्ता आठवीच्या पाठ्यपुस्तकात न्यायपालिकेतल्या भ्रष्टाचाराबाबत करण्यात आलेल्या विधानांबाबत न्यायमूर्ती इंदू मल्होत्रा यांच्या नेतृत्वाखाली तीन सदस्यीय समितीची स्थापना केली आहे. ते प्रकरण दुरूस्त करून न्यायालयाच्या मान्यतेनंतरच अभ्यासक्रमात समाविष्ट केलं जाईल, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

**<><><><><>**

ई गव्हर्नन्स सुधारणा तसंच सेवाकर्मी कार्यक्रमाअंतर्गत उत्कृष्ट कामगिरी बजावणाऱ्या जिल्हाप्रशासकीय अधिकाऱ्यांना आज मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते प्रशस्तीपत्र देण्यात आली.

या १५० दिवसांच्या कार्यक्रमात पुण्याचे गजानन पाटील, सांगलीचे विशाल नरवाडे, ठाण्याचे रणजित यादव, नाशिकचे ओमकार पवार आणि नागपूरचे विनायक महामुनी हे सर्वोत्तम सीईओ ठरले.

सर्वोत्तम जिल्हाधिकाऱ्यांचा मान जळगावचे रोहन घुगे, ठाण्याचे श्रीकृष्ण पांचाळ, धाराशिवच्या कीर्ती पुजार, लातूरच्या वर्षा ठाकूर घुगे, आणि कोल्हापूरचे अमोल येडगे यांना मिळाला.

**<><><><><>**

प्रधानमंत्री नरेंद्र मोदी उद्या, आकाशवाणीवरच्या 'मन की बात' या कार्यक्रमातून देशवासियांशी संवाद साधणार आहेत. हा या कार्यक्रमाचा १३२ वा भाग असेल. सकाळी ११ वाजता प्रसारित होणारा हा कार्यक्रम आकाशवाणी आणि दूरदर्शनच्या सर्व वाहिन्या, तसंच न्यूज ऑन ए आय आर ॲप वरुन ऐकता येईल.

**<><><><><>**

नाशिक इथला भोंदूबाबा अशोक खरात याच्यावर काल रात्री आणखी दोन गुन्हे दाखल झाले असून आता त्याच्यावर दाखल असलेल्या गुन्ह्यांची संख्या १० झाली आहे. काल रात्री दाखल झालेल्या दोन गुन्ह्यांमध्ये एका पिडितेने केलेल्या तक्रारीचा आणि एका व्यापाऱ्याने केलेल्या आर्थिक फसवणुकीच्या आरोपांचा समावेश आहे. खरातविरुद्ध तपास करणाऱ्या

एसआयटीला गेल्या पाच दिवसांत सुमारे ५० फोन आले असून फोन करणाऱ्यांनी त्यात खरातच्या गुन्ह्यांविषयी माहिती दिली आहे, असं पोलीस अधिकाऱ्यांनी सांगितलं आहे. खरातची एचआयव्ही चाचणी करण्यात आली असून तिचा अहवाल निगेटिव्ह आला आहे. खरातविरुद्ध तक्रार करू इच्छिणाऱ्यांसाठी एसआयटीने दोन फोन क्रमांक जारी केले आहेत.

<><><><><>

भोंदू बाबा अशोक खरात प्रकरणी अडचणीत आलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस नेता रूपाली चाकणकर यांनी काल पक्षाच्या महिला आघाडी अध्यक्ष पदाचा राजीनामा दिला. आज सकाळी फोनवर पक्षाध्यक्ष सुनेत्रा पवार यांच्याशी चर्चा झाल्यानंतर आपण राष्ट्रवादी महिला काँग्रेस प्रदेशाध्यक्षपदाचा राजीनामा देत असल्याचं चाकणकर यांनी समाजमाध्यमावर म्हटलं आहे.

दरम्यान, 'खरात प्रकरणाबाबत पहिल्या दिवशीच आपण आपली भूमिका स्पष्ट केली असून त्याच्या आर्थिक व्यवहारात किंवा गैरकृत्यात आपला दुरान्वयाने संबंध नाही असंही चाकणकर यांनी आपल्या पोस्टमध्ये नमूद केले आहे.

<><><><><>

सिंहस्थ कुंभमेळ्याची कामे मुदतीत पूर्ण झाली नाहीत तर संबंधित ठेकेदारांना दंड करण्यात येईल असा इशारा राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्र राजे भोसले यांनी दिला आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या आदेशानुसार सर्व कामे वेळेत पूर्ण करावीत. पावसाळ्यापूर्वी रस्त्यांची कामे पूर्ण करावी अशा सूचना त्यांनी दिल्या. सिंहस्थ कुंभमेळा प्राधिकरणाच्या

वतीनं त्रयस्थ यंत्रणेमार्फत गुणवत्ता तपासली जाणार असून कामांच्या दर्जाबाबतही तडजोड केली जाणार नाही असेही भोसले म्हणाले.

**<><><><><>**

पालघर जिल्ह्यात वसई इथं स्वतःला भगवान शिवाचा अवतार म्हणवून फसवणूक करणाऱ्या हृषिकेश वैद्य या भोंदू बाबाला काल पिंपरी चिंचवड भागातून अटक करण्यात आली. त्याच्याविरुद्ध ३५ वर्षांच्या एका महिलेने बलात्काराची तक्रार दाखल केली आहे. वैद्यने आपल्यावरचे आरोप फेटाळले आहेत.

**<><><><><>**

१९ वी इंडियन प्रीमियर लीग क्रिकेट स्पर्धा आजपासून सुरु होत आहे. संध्याकाळी बंगळुरू इथं  उद्घाटनाचा सामना एम. चिन्नास्वामी मैदानावर 'सनरायझर्स हैदराबाद' आणि गतविजेते 'रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू' या संघांमध्ये होणार आहे. हा सामना भारतीय वेळेनुसार संध्याकाळी साडे सात वाजता सुरू होणार आहे.  ही स्पर्धा ३१ मे पर्यंत सुरू राहील. गेल्या वर्षी बंगळुरूमधेच आयपीएलच्या अंतिम सामन्याच्या वेळी क्रिकेटशौकिनांच्या गर्दीत चेंगराचेंगरी झाल्यानं ११ जणांचा मृत्यू झाला होता. त्यांच्याप्रति संवेदना व्यक्त करण्याच्या उद्देशाने यंदा प्रथेनुसार  उद्घाटन सोहळा होणार नाही असं बीसीसीआयने जाहीर केलं आहे. या ११ जणांच्या स्मृतींना वंदन करण्यासाठी प्रेक्षागृहातली ११ आसनं पूर्ण स्पर्धेसाठी रिकामी ठेवण्यात येतील. सामना संध्याकाळी साडेसात वाजता सुरु होईल.

मुंबईच्या वानखेडे मैदानावर उद्या मुंबई इंडियन्स विरुद्ध कोलकाता नाईट रायडर्स यांची लढत होईल.

**<><><><><>**

हवामानशास्त्र विभागाने मुंबई, रायगड जिल्ह्याला आज उष्णतेचा यलो अलर्ट दिला आहे. या दोन्ही जिल्ह्यात आज उष्ण आणि दमट हवामान राहील. तर उद्या सांगली, सोलापूर, लातूर, धाराशिव, भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया आणि नागपूर जिल्ह्यात तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह वादळी पावसाचा यलो अलर्ट दिला आहे. येत्या काही दिवसात कोकणात रायगड, रत्नागिरी जिल्ह्यांत आणि विदर्भात भंडारा, चंद्रपूर, गडचिरोली, गोंदिया या जिल्ह्यात विजांच्या कडकडाटासह पाऊस आणि वादळी वारे वाहतील. तर अहिल्यानगर, सोलापूर, बीड, लातूर आणि धाराशिव जिल्ह्या गारपिट होईल, असा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

//<><><><><>//